# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-४५ दिनांक - १४/०२/२०२४

## नायगाव गुन्हे प्रकटिकरण शाखेकडुन जुन्या भांडणाचा मनात राग धरुन खुन करणा-या आरोपीत यास अटक करण्यात यश.

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत दि.१२/०२/२०२४ रोजी ०९.३० ते १०.०० वा. चे सुमारास भारत लॅडर कंपनी, बेलकडी गांव, कामण नायगाव पुर्व ता वसई जि पालघर यातील आरोपीत यांनी मयताच्या घरात घुसुन “ मी तुझी छेड काढतो अशी तु माझी बदनामी केली आहेस” मी तुला सोडनार नाही असे म्हणुन तिच्याशी वाद घालुन तिला लाकडी दांडक्याने जबर मारहाण करुन फिर्यादीची आई मंजुळा वय-५५ वर्षे हिचा खुन केला तसेच फिर्यादीचे वडील नामे चंदर वय-५९ वर्षे हे फिर्यादीचे आईला सोडवण्यासाठी गेले असता त्याचे अंगावर धावुन जावुन लाकडी दांडक्याने मारण्याची धमकी दिल्याने आरोपी नामे सागर रामु बेंडगा यांच्याविरुध्द गुन्हा नोंद क्र. I ८३/२०२४ भां.द.वि कलम- ३०२,४५२,५०६ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने मा. वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे वेगवेगळे पथके बनवुन सदर आरोपीत यांचा शोध घेत असताना गुप्त बातमीव्दार यांच्याकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे सागर रामु बेंडगा राहणार- मु.मोठी बेलकडी,पो.कामन,ता.वसई, जि. पालघर हा बेलकडी गांव परिसरात लपुन बसला असल्याबाबत माहिती मिळाल्याने त्यास सदर ठिकाणी जावुन ताब्यात घेवुन सदर गुन्हयात अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोनि/सागर टिळेकर करीत आहेत.

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सागर टिळेकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, स.पो.नि. गणेश केकान, रोशन देवरे, पो.उप.निरी. प्रकाश कदम, सपकाळ, विष्णु वाघमोडे, पो.हवा. श्रीकांत पाटील, पो.अंम. सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी,अमर पवार, चेतन ठाकरे,अशोक पाटील, अनिल बोडके, दिगबंर काळे यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.